Sem-III

Pepar-4

GoodLuck Page No.
Date

# Social Moment in india
# भारतातील सामाजिक चळवळी

Topic - 1]
सामाजिक चळवळ
Ⓐ सामाजिक चळवळीचा अर्थ आणि वैशिष्ट्ये
Ⓑ सामाजिक चळवळीचे घटक
Ⓒ सामाजिक चळवळीचे महत्व

Topic - 2]
शेतकरी चळवळ
Ⓐ भारतातील शेतकऱ्यांचे प्रश्न किंवा समस्या
Ⓑ प्रमुख शेतकरी चळवळी
Ⓒ शेतकरी चळवळीचा परिणाम

Topic - 3]
दलित चळवळ
Ⓐ भारतातील दलितांचे प्रश्न / समस्या
Ⓑ प्रमुख दलित चळवळी
Ⓒ दलित चळवळीचा परिणाम

Topic - 4]
आदिवासी चळवळ
Ⓐ भारतातील आदिवासींचे प्रश्न / समस्या
Ⓑ प्रमुख आदिवासी चळवळी
Ⓒ आदिवासी चळवळीचा परिणाम



Scanned with CamScanner

## भारतातील सामाजिक चळवळ

Topic No-1 सामाजिक चळवळ

GoodLuck Page No. Date

१.१] सामाजिक चळवळींचा अर्थ आणि वैशिष्ट्ये

* प्रस्तावना :-

मानवी समाजात सामाजिक परिवर्तन सतत घडून येत असते. परंतु कोणतेही परिवर्तन हे आपोआप घडून येत नाही. विशिष्ट कारणे आहेत. समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी किंवा समाजात होणाऱ्या परिवर्तनास विरोध करण्यासाठी जे संघटीतपणे प्रयत्न केले जातात. त्याला सामाजिक चळवळ म्हणून ओळखले जाते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून सामाजिक चळवळ म्हणजे सामुदायिक प्रयत्नांनी समाजात सामाजिक परिवर्तन आणणे होय. सामाजिक चळवळीद्वारे सामाजिक जीवनात परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला जातो. किंवा समाज जीवनात परिवर्तन होवू नये म्हणून त्यास विरोध करण्यासाठी देखिल चळवळी निर्माण होतात. मिरवणूका, घोषणा, मोर्चा, ~~निदर्शने~~ बहिष्कार काही वेळा हिंसा या कृतीचा अवलंब या चळवळी मध्ये केला जातो. प्रत्येक चळवळीला विशिष्ट असा विचार सरणीचा आधार असतो. चळवळी या समाजव्यवस्थेत अनुकूल स्वरूपात बदल घडवून आणतात.

आधुनिक भारतात सामाजिक चळवळीची सुरूवात ब्रिटीश राजवटीत झाली. त्यानंतर भारतात अनेक चळवळी उदयास आल्या.

* उदा :-

सुधारणा चळवळ, शेतकरी चळवळ, दलित चळवळ आदिवासी चळवळ, इत्यादी एकूण समाजात परिवर्तन घडवण्यासाठी किंवा परिवर्तनास विरोध करण्यासाठी संघटीतपणे केले जाणारे सामुहिक प्रयत्न म्हणजे सामाजिक चळवळ होय.

Scanned with CamScanner

GoodLuck Page No. Date

* व्याख्या :-

① हर्बर्ट ब्युमर :-

"सामाजिक जीवनाची नवी व्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी करण्यात येणारा सामुहिक प्रयत्न म्हणजे सामाजिक चळवळ होय."

② ड्रेसलर आणि विलीस :-

"अनेक लोक हेतू पूर्वक आणि सामूहिक रित्या परिवर्तन घडवून आणण्याचा जेव्हा प्रयत्न करतात. तेव्हा त्याला सामाजिक चळवळ असे म्हणतात."

③ हर्नल :-

एकत्रित आलेले अनेक लोक ज्या समुहाचे घटक असतात. त्या समाजात परिवर्तन घडवून आणण्यासाठी किंवा परिवर्तनाला विरोध करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करतात. त्याला सामाजिक चळवळ असे म्हणतात."

④ लुटबर्ग :-

"समाजामधील अभिवृत्ती, वर्तन आणि सामाजिक संबंधा मध्ये परिवर्तन करण्यासाठी एकत्रित केला जाणारा प्रयत्न म्हणजे सामाजिक चळवळ होय."

वरील व्याख्यावरून असे स्पष्ट होते. की सामाजिक चळवळ म्हणजे सामुहिक प्रयत्नाद्वारे समाजातील प्रचलित व्यवहार, विचार, सामाजिक संबंध यामध्ये परिवर्तन घडवून आणणे होय. परिवर्तन घडवून आणण्यासाठी जसे प्रयत्न केले जातात. तसेच काही परिवर्तनांना विरोध करण्यासाठी देखिल प्रयत्न केले जातात. सामाजिक चळवळ या संकल्पनेचा अधिक अर्थ पुढील वैशिष्ट्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

* सामाजिक चळवळींची वैशिष्ट्ये



Scanned with CamScanner

GoodLuck Page No.
Date

① सामूहिक प्रयत्न :-

सामाजिक चळवळ ही व्यक्तीगत स्वरूपाची नसते. किंवा ती व्यक्तीगत प्रश्नांमधून निर्माण केले जात नाही. सामाजिक चळवळ घडून येण्यासाठी सामूहिक प्रयत्न महत्वाचे असतात. एखादा समूह जास्तीत जास्त लोकांनी प्रयत्न केल्यास सामाजिक परिवर्तन घडवून आणले जाते. किंवा नवीन परिवर्तनास विरोध केला जातो. सामाजिक चळवळीमध्ये अनेक लोकांचा प्रत्यक्ष आणि कधी अप्रत्यक्षपणे सहभाग असतो. सामाजिक चळवळीत सहभागी झालेले लोक आपल्या उद्दिष्ट्याच्या पूर्ततेसाठी सामूहिक प्रयत्न करत असतात. परिणामी सामूहिक प्रयत्न हे सामाजिक चळवळीचे एक महत्वाचे वैशिष्ट्ये आहे.

② परिवर्तन घडवून आणणे किंवा परिवर्तनास विरोध करणे :-

कोणत्याही सामाजिक चळवळीचा मुख्य उद्देश हा प्रस्थापित समाज व्यवस्थेत परिवर्तन घडवून आणणे किंवा समाजात होत असलेल्या नवीन परिवर्तनास विरोध करणे हा असतो. समाजातील रूढी, प्रथा, परंपरा किंवा सामाजिक संबंध यामध्ये बदल करण्याची आवश्यकता असते. अशा वेळी समाजात परिवर्तन करणे हा सामाजिक चळवळीचा उद्देश असतो.

उदा :-

अस्पृश्यता नष्ट करणे, स्त्रीयांना शिक्षणाचा अधिकार मिळवूण देणे. इ. यासाठी चळवळी निर्माण केल्या जातात. कधी - कधी समाजात जे परिवर्तन होत असते. हे परिवर्तन थांबवण्यासाठी विरोध करण्यासाठी देखील सामाजिक चळवळ उभारली जाते.

③ संघटित किंवा असंघटित स्वरूप :-

सामाजिक चळवळीचे स्वरूप हे संघटित किंवा असंघटित स्वरूपाचे असू शकते. जास्तीत जास्त चळवळी यापेक्षा संघटित स्वरूपाचे असतात. लोकांमध्ये विशिष्ट प्रश्नांविषयी जागृती घडवून आणण्यासाठी संघटित

Scanned with CamScanner

प्रयत्न केले जातात. त्यासाठी संघटना देखिल स्थापना केली जाते. त्या संघटनेमध्ये असंख्य सदस्य सहभागी होतात. चळवळीच्या यशस्वीतेसाठी अशा प्रकारचे संबंध आवश्यक असते.

उदा :-
कधी - कधी समाजात काही निर्मितीक कारणांमुळे सामाजिक चळवळ निर्माण होत असते. अशा वेळी या चळवळीचे स्वरूप असंघटित स्वरूपाचे असते. परंतु चळवळीची व्याप्ती वाढत जाते. त्यावेळी संघटन निर्माण करण्याची गरज असते. याचाच अर्थ सामाजिक चळवळीचे संघटन संघटित किंवा असंघटित स्वरूपाचे असू शकते.

(4) शांततापूर्ण किंवा हिंसात्मक मार्ग :-
सामाजिक चळवळी शांततेच्या मार्गाने उभारली जाते. कोणत्याही हिंसात्मक मार्गाचा अवलंब न करता लोकांमध्ये जागृती निर्माण करून सामाजिक चळवळ राखवली जाते. जेव्हा शांततेच्या मार्गाने चळवळीचे उद्दीष्ट साध्य होत नाही, तेव्हा मात्र सामाजिक चळवळीमध्ये हिंसात्मक मार्गाचा अवलंब केला जातो.

उदा :-
रशियनक्रांती, नक्षलवादी, चळवळ इ. अशा प्रकारे सामाजिक चळवळ ही शांततापूर्ण किंवा हिंसात्मक असू शकते.

(5) अनिश्चित कालावधी :-
सामाजिक चळवळीचा कालावधी हा निश्चित नसतो. जर एखादया चळवळीचा उद्देश लवकर साध्य झाला तर ती चळवळ लवकर संपुष्टात येते. परंतु चळवळीचा उद्देश लवकर साध्य होईल याची खात्री नसते. काही चळवळी या दिर्घकाळ चालू राहतात. चळवळीला गतीमान नेतृत्व करणाऱ्या नेत्याचे निधन झाले तर ती चळवळ विस्कळीत होण्याची शक्यता जास्त असते. याचाच अर्थ सामाजिक



Scanned with CamScanner

चळवळीचा निश्चित असा कालावधी असतो. सामाजिक चळवळ हे दिर्घकाळ चालू शकते. किंवा ती अल्पकाळात नष्ट होवू शकते.

⑥ विचार प्रणाली :-

विचार प्रणाली किंवा विचारसरणी हे सामाजिक चळवळीचे मुख्य लक्षण आहे. प्रत्येक चळवळीला एक विचार प्रणाली असते. सर्व चळवळींची विचारप्रणाली एक सारखी समान असत नाही. एखादी सामाजिक चळवळ एका विशिष्ट तत्वज्ञानावर, विचारांवर आधारित असतात. त्या विचारांवर आधारित आपल्या उद्दिष्टयांची पूर्तता करण्याचा प्रयत्न केला जातो. सामाजिक चळवळीचे भवितव्य यश, अपयश हे त्या चळवळीच्या विचार प्रणालीवर अवलंबून असते.

⑦ नेतृत्व :-

नेतृत्व हे देखील सामाजिक चळवळीचे महत्वाचे लक्षण आहे. कारण नेतृत्वाशिवाय चळवळ आपले उद्दिष्ट पूर्ण करू शकत नाहीत, चळवळीच्या विविध घटकांमध्ये समन्वय घडवून आणण्यासाठी नेतृत्व आवश्यक असते. असामान्य कौशल्य लाभलेली व्यक्ती नेता म्हणून सामाजिक चळवळीचे नेतृत्व करत असते. कार्यकर्त्यांचा उत्साह टिकून आपल्या उद्दिष्टयांची पुर्तता करण्यासाठी चळवळीला योग्य दिशा देण्याचे काम नेतृत्वाकडून केले जाते.

⑧ सामाजिक असंतोष आणि सामाजिक चळवळीचा उदय :-

सामाजिक चळवळीचा उदय हा विशिष्ट सामाजिक परिस्थितीमधून होत असतो. समाजातील प्राप्त परिस्थिती विषयी असंख्य लोकांच्या मनात असमाधानाची भावना निर्माण होते. अशा प्राप्त ~~म~~ परिस्थितीत आपण सामुहिक प्रयत्नांद्वारे बदल घडवू शकतो. असा विश्वास लोकांच्या मनात निर्माण होतो. एखादी व्यक्ती पुढाकार घेवून लोकांच्या मनातील असंतोष आवाजाचा फोडते. एखादी अन्यायकारक घटना घडते व त्यावरती तीव्र प्रतिक्रिया उमटते. अशा गोष्टी घडून

Scanned with CamScanner

की त्यामधून सामाजिक चळवळीचा उदय होतो.

सामाजिक परिस्थिती विषयी लोक असमाधानी असले तरी कोणतीही सामाजिक चळवळ आपोआप निर्माण होत नाही. काही लोक अन्याय ही सहन करतात. त्यामुळे अशा लोकांमधून कोणताही पुढाकार घेवून आत्मविश्वास निर्माण केला की सामाजिक असंतोषामधूनच सामाजिक चळवळीचा उदय होत असतो.

## (9) असंस्थीकृत मार्गाचा स्वीकार :-

आपल्या हेतू गरजांच्या पूर्ततेसाठी लोक संस्थीकृती मार्गाचा स्वीकार करत असतात.

*उदा :-

अर्ज, विनंती करणे, न्यायालयाला दाद मागणे इ. सामाजिक परिस्थितीत बदल घडवण्याचे हे संस्थीकृत मार्ग आहेत. परंतु सामाजिक चळवळी असंस्थीकृत मार्गाचा स्वीकार केला जातो.

* उदा :-

हजारो लोक निर्देशने करतात. मोर्चे काढतात, घोषणा देतात, रस्ता रोखो, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान दगड फेक, जीवितहानी इ.

लोकांच्या मनातील असंतोषाची भावना परिस्थिती बदलण्याची गरज या सर्व उद्दिष्टांची अभिव्यक्ती असंस्थीकृत मार्गामधील व्यक्त केली जाते.

## (10) सामाजिक चळवळीचे जीवनचक्र आणि यश अपयश :-

सामाजिक चळवळींचा कालावधी जरी अनिश्चित असला तरी तो काही वर्षाचाच असतो. सामाजिक परिस्थितीच्या विरोधात असंतोष वाढत जातो. व त्यास एखादे नेतृत्व मिळाले की सामाजिक चळवळ उदयास येते चळवळीच्या तत्वज्ञानामुळे अनेकांचा व्यापक पाठिंबा मिळतो चळवळ अधिक संघटित होत जाते. त्यामुळे चळवळीला



Scanned with CamScanner

आपली उद्दिष्टे पूर्ण करता येतात. चळवळीचे उद्दिष्ट पूर्ण झाल्यास ती चळवळ संपुष्टात येते.

वरील प्रमाणे सर्वच चळवळी यशस्वी होतातच असे नाही. काही चळवळींना यश मिळण्यापूर्वीच नष्ट व्हावे लागते. आणि चळवळींना अल्प प्रमाणात यश मिळते. चळवळीचे यश अपयश अनेक घटकांवर अवलंबून असते. तत्वज्ञान लोकांचा सहभाग, उत्साह, प्रसार माध्यमांची भूमिका, सरकारची भूमिका, आर्थिक मदत, इ. घटक सामाजिक चळवळीचे यश अपयश ठरवण्यात महत्वपूर्ण भूमिका बजावतात.

(11) सामाजिक चळवळी सामाजिक परिवर्तनाला प्रभावित करण्यासाठीच अस्तित्वात येतात.

(12) दबाव गट म्हणजे सामाजिक चळवळी नव्हेत ~~हा~~

(13) सामाजिक चळवळी आणि सामाजिक संस्था यामध्ये फरक आहेत.

★ सारांश :-

प्रत्येक सामाजिक चळवळीचे एक विशिष्ट किंवा निश्चित उद्दिष्ट्ये असतात. ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी केले जाणारे प्रयत्न चळवळीचे स्वरूप या बाबी चळवळीच्या यश - अपयशामध्ये महत्वपूर्ण ठरत असतात. वरील वैशिष्ट्यांवरून सामाजिक चळवळ या संकल्पनेचा अर्थ आणि स्वरूप स्पष्ट केला जातो.

# B) सामाजिक चळवळीचे घटक

★ प्रस्तावना :-

कोणतेही सामाजिक चळवळ सहज, आपोआप निर्माण होत नाही. चळवळ निर्माण होईल किंवा नाही, त्यास पाठिंबा मिळेल किंवा नाही, चळवळ आपली उद्दीष्ठे पूर्ण करू शकेल किंवा नाही. हे सर्व संरचनात्मक घटकांच्यावर अवलंबून असते. सामाजिक चळवळी मध्ये त्या चळवळीचे भवितव्य हे त्या चळवळीमधील घटकांवरच अवलंबून असते. सामाजिक चळवळीचे घटक पुढीलप्रमाणे :-

## ① विचार सरणी किंवा विचार प्रणाली :-

समाजातील प्रत्येक चळवळीला एक विचार प्रणालीचा आधार असतो. चळवळ करणाऱ्यांच्या देखिल विचारांवरी विश्वास असतो. विशिष्ट विचार सरणी किंवा विचार प्रणाली विकसीत झाल्याशिवाय चळवळ टिकून राहू शकत नाही. आपण जे करत आहोत ते योग्यच आहेत. असे चळवळीच्या विचार प्रणाली मुळेच लोकांना वाटत असते. विचार प्रणालीमुळे सामान्य लोकांना चळवळीत ~~सहभागी~~ सहभागी होण्याची प्रेरणा मिळेत. अनेक वेळा विचार सरणी मध्येच उद्दीष्ठ प्राप्तीचे मार्ग सांगितले जातात.

उदा :-

महात्मा गांधीजींचा अहिंसावादी मार्ग, कार्ल मार्क्स यांचा शक्तीचा किंवा ~~हिंसेचा मार्ग~~. संघर्षवादी विचार

विशिष्ठ विचार सरणीचे त्या चळवळी मधील लोकांकडून ~~अंतीकरण~~ अंतरीकरण घडून येणे. आवश्यक असते. कारण त्यावरतीच चळवळीचे भविष्य अवलंबून असते.

## ② ऐक्याची भावना :-

सामाजिक चळवळीमध्ये ज्या व्यक्ती सहभागी झालेल्या असतात, त्या सर्वांच्यामध्ये आपण सर्वजण एक आहोत. अशा प्रकारची ऐक्याची भावना प्रखरपणे निर्माण होत असते. चळवळ यशस्वी होण्यासाठी त्या चळवळीमधील घटकांवर एकतेची भावना निर्माण होणे आवश्यक असते.



Scanned with CamScanner

GoodLuck Page No.
Date

③ आदर्श किंवा मानक :-
सामाजातील प्रत्येक चळवळीसाठी काही आदर्श किंवा मानक स्वीकारले जातात. हे आदर्श त्या चळवळीत सहभागी होणाऱ्या सर्व घटकांना मान्य करावे लागतात. त्यांचे पालन करावे लागते. विशिष्ट प्रकारचे आदर्श स्वीकारल्या-मुळे सामाजिक चळवळींच्या कार्यात कोणत्याही प्रकारचा अडथळा येत नाही. चळवळीमध्ये एक प्रकारची सुसुत्रता निर्माण होते. सामाजिक चळवळीमध्ये असणारे आदर्श सदस्यांचे आचरण, शिस्त या बाबतीत असू शकतात. चळवळीमध्ये सहभागी व्यक्तींचे वर्तन, सुगता, शिस्त, पालन यासाठी या चळवळीमध्ये असणारे काही आदर्श अत्यंत उपयुक्त ठरत असतात.

18-7-2019

④ विशिष्ट संरचना :-
प्रत्येक सामाजिक चळवळीला एक विशिष्ट संरचना असते.
त्यामुळे नेतृत्व करणारे आणि समर्थन करणारे असे दोन भाग पडतात. त्यानुसार त्यांच्याकडून कृती केली जाते. वैचारिक दिशा, निर्णय घेणे, कार्यक्रम ठरवणे, सामूहिक कृती करणे, अशा प्रकारचे कार्य चळवळीच्या रचनेतील अनेक घटकांकडून पार पाडले जाते.

⑤ नैमित्तिक घटक :-
सामाजिक चळवळीमध्ये सामूहिक वर्तन अस्तित्वात येण्यासाठी कोणती तरी नैमित्तीक घटना किंवा प्रसंग कारणीभूत ठरत असतो. लोकांमध्ये असमाधानाची, असंतोषाची सर्वसाधारण भावना असतेच, त्यात एखादा प्रसंग किंवा घटना घडली की सामूहिक भावनांचा उद्रेक होतो.
उदा :- भारतात मथुरा बलात्कार प्रकरणामुळेच बलात्कार विरोधी चळवळीला गती मिळाली होती.

23-10-2019

⑥ सामाजिक असंतोष :-
एखादया सामाजिक परस्थिती विषयी ज्यावेळी



Scanned with CamScanner

असंख्य लोकांच्या मनात असमाधानाची असंतोषाची भावना निर्माण होते. त्यावेळी समाजामध्ये सामाजिक चळवळी निर्माण होण्यास सुरुवात होते. सामाजिक असंतोष ही सामाजिक चळवळ निर्माण होण्यातील पहिली अट आहे.

⑦ संरचनात्मक तणाव :-

एखादया समुहामध्ये अपेक्षित असणारी आदर्श परिस्थिती आणि प्रत्यक्षात अस्तित्वात असणारी वस्तुस्थिती या दोन्हीमध्ये जेव्हा संघर्ष निर्माण होतो. त्या संघर्षाला संरचनात्मक तणाव म्हटले जाते. जातीय संघर्ष, वांशिक संघर्ष हे संरचनात्मक तणावामुळेच निर्माण होतात. समाजातील काही लोकांना आपण असुरक्षित आहोत. आपल्यावरती अन्याय केला जात आहे. असे वाटते त्यावेळी हे सर्व लोक एकत्र येतात. संघटित होतात. व सामाजिक चळवळ सुरु करतात.

उदा :- भारतातील दलित चळवळ

⑧ संपर्क :-

ज्या लोकांमध्ये असंतोषाची भावना पसरलेली आहे. त्या सर्वांमध्ये परस्पर संपर्क प्रस्थापित होवून आंतरक्रिया घडून येतात. त्यांच्यातील असंतोष सामुहिक स्वरुपाचा तयार होतो. हि परस्थितीच सामाजिक चळवळींना विधायक ठरते.

⑨ असंतोष दूर करण्याचा आत्मविश्वास :-

समाजातील विशिष्ट परिस्थिती विषयी असंतोषाची भावना असणाऱ्या अनेक लोकांमध्ये संपर्क प्रस्थापित होतो. अशा सर्व व्यक्ती एकत्र आल्याने त्यांच्यात आत्मविश्वासाची भावना कोणतीही सामाजिक चळवळ निर्माण होण्यासाठी त्यामध्ये लोकांचा प्रत्यक्ष सहभाग असणे. अत्यंत महत्वाचे असते. काहीही झाले तरी आपण परिस्थिती बदलू शकतो. अशा प्रकारची तीव्र भावना निर्माण झाल्याशिवाय सामाजिक चळवळ अस्तित्वात येवू शकत नाही



Scanned with CamScanner

GoodLuck Page No. Date

## (10) संघर्षाची श्रद्धा :-

समाजातील विविध परिस्थिती संदर्भात असंतोषाची, तणावाची परिस्थिती निर्माण झाल्या ~~शिवाय~~ नंतर आपणाला संघर्ष केल्या शिवाय अपेक्षित गोष्टी मिळणार नाहीत. संघर्षा शिवाय आपला लढा निर्माण होणार नाही. अशा प्रकारची भावना वाढिस लागते. संघर्षाबद्दल असणारी ही भावना, श्रद्धा निर्माण झाल्याने अनेक लोक संघटित होत जातात. अशा संघटनामधूनच सामाजिक चळवळी उदयास येतात.

## (11) सामाजिक नियंत्रणाच्या यंत्रणा :-

विविध परिस्थितीच्या विरोधात चळवळी मधील कार्यकर्ते रस्ता वरती येवून निदर्शने करतात. अशावेळी शासन, पोलीस या सामाजिक नियंत्रणाच्या यंत्रणा ही आंदोलने मोडित काढण्याचा प्रयत्न करतात, त्यांच्यावरती दबाव टाकतात. ध्येया पासून विचलीत करण्याचा प्रयत्न करतात परंतु या सर्व परिस्थितीवर जी चळवळ मात करते. तीच पुढे टिकून राहते.

## ☆ सारांश :-

कोणतीही सामाजिक चळवळ अस्तित्वात येण्यासाठी व ती सामाजिक चळवळ दिर्घकाळ टिकून राहण्यासाठी वरील सर्व प्रकारचे घटक समाजामध्ये निर्माण होणे. अत्यंत आवश्यक असते. सामाजिक चळवळी मधील या घटकांमुळेच चळवळीला योग्य दिशा मिळते. चळवळीचे यश - अपयश याच घटकांवरती अवलंबून असते.



Scanned with CamScanner

# ८) सामाजिक चळवळींचे महत्व

## * प्रस्तावना :-

मानवी समाज हा परिवर्तनशील आहे. सामाजिक परिवर्तन आणि सामाजिक चळवळी यांचा निश्चित संबंध आहे. सामाजिक चळवळी या परिवर्तनाला चालना देत असतात. अगदी प्राचीन काळापासून सामाजिक चळवळी चालत आलेल्या आहेत. सामाजिक चळवळी या समाजाच्या परिस्थितीनुसार, गरजेनुसार निर्माण होत असतात. त्यामुळे सामाजिक चळवळी या समाजासाठी उपयुक्त ठरतात. उदा :- स्वातंत्र्य चळवळ शेतकरी चळवळ, दलित चळवळ, आदिवासी चळवळ इ. सामाजिक चळवळींच्या माध्यमातून सामाजिक प्रश्न समस्या, सामूहिक पणे सोडवण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे सामाजिक चळवळींची गरज, सामाजिक चळवळींची आवश्यकता व सा. चळवळी महत्व हे अत्यंत महत्वाचे आहे. ते पुढीलप्रमाणे.

## (1) सामाजिक सुधारणा :-

भारतीय समाजात १९ व्या शतकात म्हणजेच ब्रिटीश राजवटीत सामाजिक सुधारणा घडून येण्यास चालना मिळाली अनेक समाज सुधारकांनी सामाजिक चळवळींच्या माध्यमातून सामाजिक सुधारणा करण्यास प्रयत्न केला. उदा :- परंपरागत रूढी, प्रथा नष्ट करणे स्त्रीयांवरील अत्याचार थांबवणे इ.

याचाच अर्थ सामाजिक चळवळी ह्या समाजामध्ये असणाऱ्या अनिष्ठ प्रथा, परंपरा याचे उच्चाटन करण्याच्या हेतून प्रयत्न करत असतात. उदा :- देवदासी प्रथा, हुंडा विरोधी चळवळ इ. सामाजिक चळवळींच्या माध्यमातून समाजामध्ये सुधारणा, बदल घडवून आणला जातो. यासाठी सामाजिक चळवळींची आवश्यकता आहे.

② सामाजिक परिवर्तनासाठी महत्वपूर्ण :-

सा. चळवळीमुळेच समाजामध्ये सामाजिक परिवर्तन घडून येत असते. समाजातील अनिष्ठ प्रथा नष्ट करणे. प्रस्थापित व्यवस्था बदलने, अन्यायाचा विरोधात लढा देणे. या सर्वांसाठी त्या समाजात परिवर्तन घडवून आणणे आवश्यक असते. सामाजिक चळवळी या सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचे महत्वपूर्ण कार्य करतात सामाजिक चळवळीमुळे परिवर्तन होण्यास मदत होते.
उदा :- ब्राम्हो समाज चळवळीने केलेल्या सुधारणा।

③ अन्याय व अत्याचारास विरोध करणे :

समाजातील विविध घटकावरती होणाऱ्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्याचे महत्वाचे कार्य सा. चळवळीकडून पार पाडले जाते भारतीय समाजात स्वातंत्र्य पूर्व काळ, दलित, अस्पृश्य स्त्रीया यांच्यावरती मोठ्या प्रमाणात अन्याय, अत्याचार केले जात होते. परंतु या विरोधात महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अवाज उठवला. यामधूनच सामाजिक चळवळी निर्माण झाल्या. या चळवळींनी लोकांचे शोषण थांबवून त्यांचे हक्क मिळवून दिले यांचाच अर्थ अन्याय व अत्याचाराला विरोध करण्यासाठी सामाजिक चळवळी अत्यंत महत्वपूर्ण ठरलेल्या आहेत.

④ सामाजिक समता प्रस्थापित करणे :

भारतीय समाज हा विविधतेने नटलेला असल्याने या समाजात अनेक प्रकारची सामाजिक, आर्थिक विषमता दिसून येते. उदा :- जातीभेद, श्रीमंत-गरीब, श्रेष्ठ-कनिष्ठता इ. अशा प्रकारच्या सामाजिक विषमतेमुळे त्या समाजाची अधोगती होत असते. त्या समाजाची प्रगती करावयाची असल्यास विषमता नष्ट करणे महत्वाचे असते. समाजातील विषमता नष्ट करून सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी सामाजिक चळवळी अत्यंत उपयुक्त ठरत असतात.

⑤ जनजागृती :-

सर्व समाजामध्ये विशेषतः भारतीय समाजात अनेक सामाजिक समस्या अस्तित्वात आहेत. या समस्या नष्ट करण्यासाठी यावरती अनेक उपाय योजना केल्या जातात. या उपाय योजनांमध्ये सर्वात महत्वाचा उपाय म्हणजे समाजाचे प्रबोधन करणे. समाजामध्ये जनजागृती निर्माण करणे होय.

सामाजिक प्रबोधन, जनजागृती हे कार्य सामाजिक चळवळींच्या माध्यमातून अत्यंत प्रभावीपणे केले जाते. उदा :- शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी शेतकरी चळवळीचे कार्य

⑥ सामाजिक न्याय :-

समाजातील अनेक घटकांवरती अनेक वेळा अन्याय होत असतो. आपले हक्क, अधिकार, यापासून त्या समाजाला वंचित ठेवले जात असते. त्यामुळे समाजात सामाजिक विषमता, असमानता निर्माण होत असते. अशी परिस्थिती समाजाच्या प्रगतीमध्ये अडथळा ठरत असते. अशा वेळी समाजामध्ये सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी सामाजिक चळवळी प्रयत्नशील असतात. परिणामी सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी. सामाजिक चळवळी सतत प्रयत्न करत असतात. त्यामुळे त्यांची आज आधुनिक समाजात आवश्यकता आहे.

⑦ सामाजिक नियंत्रण प्रस्थापित करणे :-

समाजामध्ये सामाजिक नियंत्रण निर्माण करण्यामध्ये सा. चळवळीकडून मोठ्या प्रमाणात मदत होत असते. अनेक वेळा समाजातील अनिष्ठ, रूढी, प्रथा, परंपरा ह्या सा. जीवन विघटित करण्याचे काम करत असतात. काही वेळा सा. मूल्यांमध्ये बदल होतो. त्यामुळे परिवर्तन घडून येत असते अशा वेळी सा. वर्तनावर नियंत्रण ठेवणे आवश्यक असते. सामाजिक चळवळींच्या माध्यमातून सा. नियंत्रण निर्माण करून समाजात सुव्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातात. त्यामुळे सामाजिक चळवळी ह्या समाजाच्या हितासाठी महत्वपूर्ण ठरतात.

⑧ नेतृत्व निर्मिती :-
सामाजिक असंतोषातून सामाजिक चळवळ सुरू होत असली तरी ती चळवळ संघटित करण्यासाठी या चळवळीला योग्य दिशा देण्यासाठी योग्य नेतृत्वाची गरज असते. काही व्यक्तींकडे जन्मत:च काही प्रमाणात नेतृत्व गुण असतात, परंतु अनेकांना आपल्या नेतृत्व गुणांचा अविष्कार करण्याची संधी चळवळीमुळेच प्राप्त होत असते. सामाजिक परिस्थिती असंतोष सामाजिक चळवळ यामधूनच नवीन नेतृत्व उदयास येत असते. उदा:- स्वातंत्र्य चळवळीतून भारताला अनेक नेते मिळाले. उदा :- लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, पंडित नेहरू, इ.

⑨ प्रस्थापित व्यवस्थेवर दबाव टाकणे :-
सामाजिक चळवळीमध्ये लोक संघटित होतात आणि सामूहिक प्रयत्नांच्या माध्यमातून समाजामध्ये बदल करण्याचा प्रयत्न करतात. त्यावेळी समाजातील प्रस्थापित वर्ग, शासन यांच्याकडून बळाचा वापर केला जातो. अशा वेळी प्रस्थापित वर्ग, व्यवस्था, शासन, सत्ताधारी यांच्यावरी दबाव टाकण्याचा प्रयत्न सामाजिक चळवळींच्या माध्यमातून केला जातो.

☆ सारांश :-
सामाजिक चळवळ ही एक महत्वाची सामाजिक कृती आहे. सा. चळवळी व सामाजिक परिवर्तन यांचा निकटचा संबंध आहे. सा. चळवळीमुळे मानवी जीवन, समाज व्यवस्था, सुव्यवस्थित व स्थिर राहण्यास मदत होते. समाजामध्ये एकात्मता निर्माण करण्यासाठी संघटित समाजरचना तयार करण्यासाठी सामाजिक चळवळी या अत्यंत महत्वाच्या असतात.



Scanned with CamScanner

GoodLuck Page No.
Date

प्रश्न

★ दिर्घोत्तरी प्रश्न

① सामाजिक चळवळीची व्याख्या सांगून वैशिष्ट्ये स्पष्ट करा?

② सामाजिक चळवळीचा अर्थ सांगून सा. चळवळीचे घटक स्पष्ट करा?

③ सा. चळवळीचे महत्व स्पष्ट करा?

★ टिपा लिहा

① सा. चळवळीचा अर्थ

② सा. चळवळींची वैशिष्ट्ये

③ सा. चळवळींचे घटक

④ सा. चळवळींचे महत्व किंवा आवश्यकता



Scanned with CamScanner